महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीबीटी-०६२२/प्र.क्र.३४/२०२३/३१ दिनांक - ०५ फेब्रुवारी, २०२४

## - :प्रसिद्धीपत्रक:-

**विषय** :- दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकेवर हरकती/आक्षेप नोंदविण्याबाबत.

**संदर्भ** :-आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

आयोगामार्फत घेण्यात येणा-या संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकावर उमेदवारांच्या हरकती मागविण्यात येणार असल्याचे संदर्भाधीन प्रसिध्दीपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. उमेदवारांना संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांवर हरकती/आक्षेप नोंदविण्यासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ या मेनूमध्ये ‘Question Paper Objection- Adv.No.95/2022 and 98/2022’, ‘Question Paper Objection- Adv.No.106/2022 and 17/2023’ व ‘Question Paper Objection- Adv.No.27/2022’ अशा जाहिरात क्रमांकानुसार ३ स्वतंत्र वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

३. संगणक प्रणालीवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांवर उमेदवारांना हरकती/आक्षेप मागविण्यासाठी उमेदवारांनी करावयाची कार्यवाही खाली नमुद केली आहे:-

**टप्पा १**: - उमेदवाराने “Reset Password” टॅबवर क्लिक करणे आवश्यक आहे आणि त्याचा Seat Number/Roll Number हा User ID/ Login ID म्हणून प्रविष्ट करावा आणि “Reset Your Password” टॅबवर क्लिक करावे.

**टप्पा २**: - तदनंतर रीसेट पासवर्ड लिंक उमेदवाराने त्याच्या अर्जामध्ये प्रविष्ठ केलेल्या ईमेल आयडीवर पाठविला जाईल. उमेदवारांनी त्या लिंकचा वापर करून त्यांचा पासवर्ड सेट करावा.

**टप्पा ३**: - सेट पासवर्ड व User ID/Login ID चा वापर करुन लॉग इन केल्यानंतर उमेदवाराने Question ID व Option ID ओळखण्यासाठी "Candidate Response Sheet" हा टॅब तपासणे आवश्यक आहे.

**टप्पा ४**: उमेदवाराने “Objection” टॅबवर क्लिक करावे आणि नंतर “Click to raise objection+” वर क्लिक करावे. ज्या प्रश्नासाठी आक्षेप घ्यावयाचा आहे तो Question ID ड्रॉपडाउनमधून निवडावा.

**टप्पा ५**: - उमेदवाराने "Type of Objection" निवडून "Clarification / Expected Correct Answer / Remarks" टॅबमध्ये त्यांचे स्पष्टीकरण नमूद करणे आवश्यक आहे.

**टप्पा ६**: - जेव्हा उमेदवार "Multiple Correct Answers" आणि "Incorrect Answer key" म्हणून आक्षेपांचा/ हरकतीचा प्रकार निवडतो तेव्हा उमेदवाराने त्यांच्या Response Sheet मधील त्याला योग्य वाटत असलेल्या Option ID प्रविष्ट करणे आवश्यक आहे.

- हरकत/आक्षेप नोंदविण्यासाठी प्रति प्रश्न रु. १००/- इतके शुल्क आकारले जाईल.
- हरकत/आक्षेप शुल्क ना-परतावा आहे.
- हरकत/आक्षेप सोमवार दिनांक ५ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ०२:००:०० ते १० फेब्रुवारी, २०२४ रोजी रात्री २३:५५:०० पर्यंत नोंदविता येतील.
- याबाबत तांत्रिक अडचण आल्यास आपणास ७९९६१०८७७७ या टोल फ्री क्रमांकावर सोमवार ते शनिवार सकाळी ०९:०० ते सायंकाळी ०६:०० पर्यंत संपर्क साधून मदत घेता येईल.

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई